# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### नेरुळ (नवी मुंबई, जि.ठाणे) येथील बालीशाह बाबा दर्गा उध्वस्त केल्याबाबत

**(१) २२०२ (१३-१२-२०१४). ॲड.वारीस पठाण (भायखळा), श्री.इम्तीयाज सय्यद (औरंगाबाद मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेरुळ (नवी मुंबई, जि.ठाणे) येथील २०० वर्षे जुना बालीशाह बाबा दर्गा व अन्य नवी मुंबई महानगरपालिकेने माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्या सुमारास रात्री उध्वस्त करण्याच्या केलेल्या कारवाई संदर्भात लोकप्रतिनिधी व विविध सामाजिक संस्थांचे पदाधिकारी तसेच जागरुक नागरिक यांनी मा.मुख्यमंत्री, मा.मंत्री (गृह), मा.राज्यमंत्री (गृह), मा.पोलीस महासंचालक (महा.राज्य) यांच्याकडे लेखी स्वरुपात चौकशीची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनातर्फे कोणती कारवाई करण्यात आली वा दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली,

(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे कोणती ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०८-२०१६) :**(१) व (२) नेरुळ (नवी मुंबई, जि.ठाणे येथील) २०० वर्षे जुना बालीशहा बाबा दर्गा व अन्य नवी मुंबई महानगरपालिकेने माहे नोव्हेंबर २०१४ मध्ये वा त्या सुमारास रात्री उध्वस्त करण्याच्या केलेल्या कारवाई संदर्भात लोकप्रतिनिधी व विविध सामाजिक संस्थाचे पदाधिकारी तसेच जागरुक नागरिक यांनी लेखी स्वरुपात चौकशी मागणी केल्याबाबत कोणत्याही प्रकारचे अर्ज नेरुळ पोलीस ठाणेस प्राप्त नाही.

परंतु दि.०१.११.२०१४ रोजी ००.३० ते ०५.३० वा. चे दरम्यान सिडको, नवी मुंबई यांचेवतीने श्री.अनिल पाटील (मुख्य अनधिकृत बांधकाम नियंत्रण) यांचे नेतृत्वाखाली नेरुळ पोलीस ठाणे हद्दीतील अनधिकृत असलेले

१. बालीशाह बाब दर्गा, से.३४ नेरुळ
२. हजरत सयद अली पीर अमीर शहा बाबा दर्गा, से.२८, नेरुळ

३. समुद्रेश्वर मंदिर, करावे नेरुळ या धार्मिक स्थळाचे निष्कासन मा.उच्च न्यायलायाचे आदेश क्र.२१८/२०१३ अन्वये सदरची कारवाई सिडको अतिक्रमण विभाग (अनधिकृत बांधकाम नियंत्रण) यांनी राबविलेली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वरळी, मुंबई येथील कॅम्पाकोला कंपाऊंडचे बांधकाम तातडीने नियमित करण्याबाबत**

**(२) ४५१९ (१३-१२-२०१४). श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वरळी, मुंबई येथील कॅम्पाकोला कंपाऊंडच्या इमारतीचे बांधकाम नियमित करुन राज्यात नव्याने अस्तित्वात आलेल्या शासनाने तेथील रहिवाश्यांना दिलासा देण्यास कोणतीही हरकत नसल्याचे मत मा.सर्वोच्च न्यायालयाने नोंदविल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०१४ च्या पहिल्या सप्ताहात वा त्यासुमारास वा तत्पूर्वी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तद्नुषंगाने सदरहू इमारतीचे बांधकाम तातडीने नियमित करण्याबाबत शासनाकडून आजतागायत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, उक्त प्रकरणी होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०८-२०१६) :**(१) वरळी येथील कॅम्पाकोला इमारतीतील सदनिका धारकांनी मा.सर्वोच्च न्यायालयाच्या दि.२७/०२/२०१३ व दि.०१/१०/२०१३ रोजीच्या आदेशांचे स्पष्टीकरण होण्यासाठी याचिका दाखल केली होती. त्यावर मा.सर्वोच्च न्यायलायाने दि.३०/०१/२०१५ च्या आदेशान्वये असे स्पष्टीकरण दिलेले आहे की, याचिकाकर्ते यांनी राज्य शासनाकडे यासंबंधी निवेदन दिल्यावर राज्य शासन त्यावर नियमाचे तरतुदीनुसार आदेश पारित करु शकेल.
(२) व (३) यासंदर्भात सहकारी गृहनिर्माण संस्थेचे दिनांक ३०/०१/२०१५ रोजीचे निवेदन शासनास प्राप्त झालेले असून त्यावर मा.सर्वोच्च न्यायलयाचे दि.३०/०१/२०१५ रोजीचे आदेश विचारात घेवून नियमानुसार कार्यवाही करणेत येत आहे.

---

**मुंबई महापालिकेने मोकळ्या जागेवर वाहनतळ उभारण्याबाबत**

**(३) ७९०४ (०६-०७-२०१५). श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील दिवसेंदिवस वाढती वाहनांची संख्या लक्षात घेऊन पार्किंगच्या जागेकरिता पुरेशी वाढ करण्याकरीता मुंबई महापालिकेने मोकळ्या जागांबाबतच्या सध्याच्या धोरणाचे कोणतेही

उल्लंघन न करता वाहनतळ उभारण्यासाठी करावा तसेच जागांचाही शोध घ्यावा असे आदेश मा. मुख्यमंत्री महोदयांनी नुकतेच माहे जानेवारी, २०१५ मध्ये महापालिकेस दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त आदेशानुसार महापालिकेने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, मुंबईतील कोणकोणत्या ठिकाणी मोकळ्या जागा महापालिकेच्या निदर्शनास आल्या आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०८-२०१६) :**(१) अशी बाब नाही.

मा.मुंबई उच्च न्यायालयाकडील जनहित याचिका क्र. ६२/२०१४ मध्ये बृहन्मुंबई क्षेत्रामधील पार्किंगच्या बिकट प्रश्नावर मा.उच्च न्यायालयाने उपस्थित केलेल्या मुद्द्यांवर तसेच इतर अनुषंगिक मुद्द्यावर चर्चा करुन सर्वसमावेशक असा तोडगा काढणेबाबत संबंधितांची बैठक घेवून निर्णय घेणेचे मा.मुख्य सचिव यांना आदेश दिलेले होते. यासंदर्भात दिनांक ४.३.२०१५ रोजी मा.मुख्य सचिव यांचेकडे बैठक पार पडलेली आहे. सदर बैठकीमध्ये मैदानांच्या खाली वाहनतळ उपलब्ध होणेच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेने याबाबतचे विनियम बृहन्मुंबईची सुधारित प्रारुप विकास योजना शासनास मंजूरीसाठी सदर करताना अंतर्भूत करणेबाबत प्रस्ताव करावा असे ठरलेले आहे.

(२) व (३) बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून सुधारित प्रारुप विकास योजना व याबाबतचे नियम वैधानिक कार्यवाही पूर्ण करुन प्रसिध्द केलेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईला चारही बाजुंनी जोडणाऱ्या सागरी रस्त्यांचे प्रकल्प मंजुरीबाबत

**(४) ८७९९ (०७-०४-२०१५). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईला चारही बाजुंनी जोडणा-या सागरी रस्त्यांचे प्रकल्प मंजुरीच्या बाबतीत अंतिम टप्प्यात पोहोचले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्प अंतिम मंजूरीसाठी केंद्राच्या पर्यावरण मंत्रालय यांच्याकडे पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रकल्पाचे स्वरुप काय आहे व शासन स्तरावर प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण होण्याकरिता कोणती पावले उचलण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०८-२०१६) :**(१) मुंबई शहरातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी नरिमन पॉईंट ते बोरीवली या कोस्टल रोडचा प्रस्ताव आहे. त्याबाबतची कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून करणेत येत आहे.

(२) केंद्र शासन पर्यावरण व वनमंत्रालयाकडील दिनांक ३०.१२.२०१५ रोजीच्या अधिसूचनेनुसार दिनांक ६.१.२०११ रोजीच्या सीआरझेड अधिसूचनेमधील तरतूदींमध्ये सुधारणांना मंजूरी दिलेली आहे. त्याअनुषंगाने कोस्टल रोडचा प्रस्ताव महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ॲथारिटीकडे मंजूरीसाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून सादर करण्यात आलेला आहे.

(३) प्रश्नाधीन कोस्टल रोडचा विस्तृत प्रारुप प्रकल्प अहवाल हा बृहन्मुंबई महानगरपालिकेने महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर जनतेच्या सूचना/हरकतीसाठी २५ जून २०१५ रोजी उपलबध केलेला होता.

सदर रस्त्याच्या प्रारुप प्रकल्प अवालामध्ये पर्यावरणीय दृष्टिकोनातून मूल्यमापन करण्यात आलेले आहे. पूर्ण प्रकल्पाचे पुनर्विलोकनासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने सल्लागाराची नेमणूक केली आहे. या प्रकरणी प्राप्त झालेल्या तक्रारींचे अवलोकन करणे व नागरिकांच्या सूचना/हरकती विचारात घेवून प्रकल्पाचे पुढील तपशीलवार अंदाजपत्रक/आराखडे बृहन्मुंबई महानगरपालिकेने तयार करणे अभिप्रेत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईमध्ये एटीएम, डेबिटकार्ड आणि बँकेचे ऑनलाईन व्यवहात पिनक्रमांक चोरून पैसे चोरण्याच्या गुन्ह्यामध्ये वाढ झाल्याबाबत.**

**(५) ८८६५ (०७-०४-२०१५). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईमध्ये एटीएम, डेबिटकार्ड आणि बँकेचे ऑनलाईन व्यवहारात कोडक्रमांक चोरून त्याव्दारे खात्यातून पैसे चोरण्याच्या गुन्ह्यामध्ये वाढ झाली असून सन २०१४ मध्ये १५९ गुन्हे घडले, त्यापैकी केवळ २० जणांनी पोलिसांत तक्रारी केल्या असल्याचे दि. १९ जानेवारी २०१५ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कांदिवलीत राहणारे रमेश देसाई यांच्या खाजगी बँकेत असलेल्या खात्यामधून परस्पर ४० हजार रूपये काढण्यात आले त्याबाबत त्यांनी कांदिवली पोलिसात तक्रार केल्याचे समोर आले आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, अशा अनेक नागरिकांची फसवणूक होत असून तपास लागणे कठीण असल्याची भावना निर्माण झाल्यामुळे नागरिक पोलीसात तक्रार करण्यात पुढे येत नाही, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०८-२०१६) :**(१) मुंबई मध्ये एटीएम, डेबिट कार्ड बाबत तसेच बँकेच्या ऑनलाईन व्यवहारात पिनकोड चोरुन पैसे चोरण्याबाबत सन २०१४ व २०१५ मध्ये अनुक्रमे ३६२ व ४७८ गुन्हे दाखल आहेत.

(२) नमूद तक्रारदार यांची प्रस्तुत प्रकरणी कांदिवली पोलीस ठाणेस तक्रार नोंद नाही.

(३) नाही.

(४) अशा प्रकरणी तक्रारदाराने पोलीस ठाणेस तक्रार दिल्यास सदर प्रकरणी त्वरीत गुन्हा नोंद करुन पुढील तपास करण्यात येतो.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वर्सोवा व अंधेरी (प) येथील रहिवाशांची या भागात नाट्यगृहाची मागणी**

**(६) ११३४८ (०७-०४-२०१५). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वर्सोवा व अंधेरी (प) येथील रहिवाशांची या भागात नाट्यगृह व्हावे अशी मागणी आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, येथील रहिवाशांना नाटक बघण्याकरीता पार्ले, दादर अथवा बोरिवली येथे जावे लागते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अंधेरी (प) येथील शहाजी राजे क्रीडा संकुल येथे नाट्यगृह बांधण्यासंबंधीचे सुतोवाच महापालिकेने केले होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, त्याबाबतची सद्यस्थिती काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०८-२०१६) :**(१) होय.
(२) होय.
(३) होय.
(४) व (५) आंबिवली, अंधेरी (प) येथील न.भू.क्र. ८०१ व इतर जमिनीवर शहाजीराजे क्रिडा संकुल अस्तित्वात आहे. मंजूर विकास आराखड्यानुसार सदर भूखंडावर क्रिडा संकुल व शॉपिंग सेंटर असे आरक्षण असून शॉपिंग सेंटर या आरक्षणात फेरबदल करुन महापालिका क्रिडा संकुल, नाट्यगृह आणि सांस्कृति केंद्र व इतर संलग्न वापर असा फेरबदल प्रस्ताव बृहन्मुंबई महापालिकेने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियमाचे कलम ३७(१) अन्वये फेरबदलाची वैधानिक कार्यवाही पूर्ण करुन मंजूरीस्तव शासनास सादर केला आहे. फेरबदल प्रस्तावास शासनाने मंजूरी दिली आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियमाचे कलम ३७(२) अन्वये अधिसूचना निर्गमित करण्यात येत आहे.

---

**नरिमन पॉईंट ते गोराई दरम्यान ३५ किमी लांबीचा किनारपट्टी मार्ग (कोस्टल मार्ग) बांधण्याबाबत**

**(७) १६४२० (११-०८-२०१५). डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.छगन भुजबळ (येवला),**

**श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नरिमन पॉईंट ते गोराई दरम्यान ३५ किमी लांबीचा किनारपट्टी मार्ग (कोस्टल मार्ग) बांधण्याची मुंबई महानगरपालिकेची योजना असून राज्य शासनाने याबाबत मंजूरी दिली असल्याचे माहे एप्रिल-२०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सीआरझेडमध्ये सुधारणा केल्याशिवाय किनारपट्टी मार्ग करणे शक्य नसल्याने या कायद्यात बदल करण्याची मागणी राज्य सरकारने केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाने किनारपट्टी मार्ग (कोस्टल मार्ग) प्रस्तावाला मान्यता दिली आहे काय,

(४) असल्यास, नरिमन पॉईंट ते गोराई किनारपट्टी मार्गाबाबत शासनाने आपली भूमिका स्पष्ट करुन याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०८-२०१६) :**(१) सदर प्रकल्पास राज्य शासनाची मान्यता आहे.

(२) व (२) केंद्र शासन पर्यावरण व वन मंत्रालयाकडील दिनांक ३०.१२.२०१५ रोजीच्या अधिसूचनेनुसार दिनांक ६.१.२०११ रोजीच्या सीआरझेड अधिसूचनेमधील तरतूदींमध्ये सुधारणांना मंजूरी दिलेली आहे. त्याअनुषंगाने कोस्टल रोडचा प्रस्ताव महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ॲथारिटीकडे मंजूरीसाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून सादर करण्यात आलेला आहे.

(४) व (५) प्रश्नाधीन कोस्टल रोडचा विस्तृत प्रारुप प्रकल्प अहवाल हा बृहन्मुंबई महानगरपालिकेने महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर जनतेच्या सूचना/हरकतीसाठी २५ जून २०१५ रोजी उपलब्ध केलेला होता.

सदर रस्त्याच्या प्रारुप प्रकल्प अहवालामध्ये पर्यावरणीय दृष्टिकोनातून मूल्यमापन करण्यात आलेले आहे. पूर्ण प्रकल्पाचे पुनर्विलोकनासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने सल्लागाराची नेमणूक केलेली आहे. या प्रकरणी प्राप्त झालेल्या तक्रारींचे अवलोकन करणे व नागरिकांच्या सूचना/हरकती विचारात घेवून प्रकल्पाचे पुढील तपशीलवार अंदाजपत्रक/आराखडे बृहन्मुंबई महानगरपालिकेने तयार करणे अभिप्रेत आहे.

---

## मुंबई महानगरपालिकेने जागेत रेणवॉटर हार्वेस्टींग प्रकल्प कार्यान्वित करण्याबाबत दिलेल्या सूचना

**(८) १८४५८ (१२-०८-२०१५). श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.सुधाकर भालेराव (उदगीर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण**

**पूर्व), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील भूजलाची पातळी दिवसेंदिवस खालावत असल्याने मुंबई महानगरपालिकेने ३०० चौ.मि. जागेत रेनवॉटर हार्वेस्टींग प्रकल्प कार्यान्वित करण्याबाबत सूचना गृहनिर्माण संस्थांना दिल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार आतापर्यंत किती गृहनिर्माण संस्थांनी रेन वॉटर हार्वेस्टिंग प्रकल्पांची कामे हाती घेतली आहेत,

(३) असल्यास, सदर प्रकल्पाच्या निर्मितीसाठी राबवावयाच्या योजनेसंदर्भात शासनाने महानगरपालिकांना कोण कोणते मार्गदर्शन केले आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०८-२०१६) :**(१) बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावलीमध्ये शासनाकडील दिनांक ६.६.२००७ रोजीच्या अधिसूचनेनुसार फेरबदल मंजूर करण्यात आलेले आहेत.त्यानुसार ३०० चौ.मी. पेक्षा कमी क्षेत्र नसलेल्या गावठाणा बाहेरच्या भूखंडावरील बांधकाम प्रकल्पांना रेन वॉटर हार्वेस्टींग योजना राबविणे बंधनकारक आहे.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रामध्ये १६३४ विविध ठिकाणी रेन वॉटर हार्वेस्टींग योजना कार्यान्वित करण्यात आली आहे.

(३) विनियमामध्ये तरतूद करणेत आलेली असल्याने वेगळयाने मार्गदर्शन करणेची बाब उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील घाटकोपर येथील स्वातंत्र्यवीर सावरकर मार्गावर महानगरपालिकेने भाजी मार्केटसाठी भूखंड आरक्षित केल्याबाबत

**(९) २०६५६ (११-०८-२०१५). श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील घाटकोपर येथील स्वातंत्र्यवीर सावरकर मार्गावरील गल्ली क्र.१७ येथील सुमारे २ एकर भूखंड महानगरपालिकेने भाजी मार्केटसाठी आरक्षित केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणी भाजीमार्केट उभारण्याबाबतची सद्यस्थिती काय आहे,

(३) असल्यास, सदर भूखंडावर डंपर, जुन्या इमारतीचे दगड, सिमेंट व इतर टाकावू सामान ठेवण्यासाठी वापर करीत असल्याची बाब नुकतीच उघडकीस आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त भूखंडावरील अतिक्रमण काढून टाकून त्याठिकाणी महापालिकेचे भाजीमार्केट उभारण्याचे दृष्टीने शासन कोणती कार्यवाही करीत आहे वा करणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०८-२०१६) :**(१) होय.
(२) सदर ठिकाणी महापालिका मंडई प्रस्तावित असून त्यासंदर्भात १.०० चटई क्षेत्र निर्देशांकाप्रमाणे प्रस्ताव महानगरपालिकेच्या वास्तूविशारद यांचेमार्फत तयार करणेत आला असून सदर भूभाग महानगरपालिका स्वत: विकसित करणार आहे.
(३) सदर भूखंडावर दगड, सिमेंट व डेब्रीज पडलेले आहे ही बाब खरी आहे.परंतु सदर ठिकाणी उपद्रव शोधकांची नेमणूक करण्यात आली असून मौदानावर कोणीही दगड माती सिमेंट डेब्रीज टाकू नये याची काळजी घेण्यात येत आहे.
(४) व (५) सदर भूखंडावर कोणतेही अतिक्रमण नाही. महापालिकेच्या वास्तूविशारद यांचेमार्फत महानगरपालिका मंडईचा प्रस्ताव तयार करणेत आलेला आहे.

---

## मानखुर्द-शिवाजी नगर या नागरी प्रभागात पेयजलाची भीषण टंचाई तसेच पूर्ण दाबाने पेयजल वितरणाबाबत

**(१०) २८५४९ (२१-०१-२०१६). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ईशान्य महामुंबई स्थित मानखुर्द-शिवाजी नगर या नागरी प्रभागात पेयजलाची भीषण टंचाई तसेच पूर्ण दाबाने पेयजल वितरणाबाबत नागरी प्रशासनाचे दिवसेंदिवस होत चालेल्या दुर्लक्षाबाबत कार्यवाही करण्याची मागणी स्थानिक विधानसभा सदस्य, स्थानिक रहिवाशी संघ जसे रफिक नगर, साठे नगर, संजय नगर, पद्मा नगर, चिखलवाडी, एकता नगर, वा आसपासच्या परीक्षेत्रातील नागरी संघटनांनी मा. मुख्यमंत्री, (नगरविकास), राज्यमंत्री (नगरविकास), प्रधान सचिव (नगरविकास), आयुक्त (बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासन), सह आयुक्त (महामुंबई उत्तर पूर्व महानगरपालिका परीक्षेत्र), उपायुक्त तसेच सहाय्यक महापालिका आयुक्त एम/पूर्व महापालिका विभाग यांच्याकडे माहे सप्टेंबर २०१५ वा त्या सुमारास लेखी निवेदनाद्वारे केलेली आहे, हे खरे आहे काय?
(२) असल्यास, माहे सप्टेंबर २०१५ मध्ये या कालावधीत करण्यात आलेल्या सूचनांच्या कार्यवाहीपुर्तीबाबत कोणता ठोस निर्णय घेण्यात आला वा येत आहे,
(३) नसल्यास, सदर बाबतीत असलेले विलंबाची सर्वसाधारण कारणे कोणती, सदरचे काम किती कालावधीत पूर्ण केले जाईल ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०९-२०१६) :**(१) हे खरे नाही.
तथापि, याबाबतचे दिनांक १४ ऑगस्ट, २०१४ चे निवेदन प्राप्त झाले आहे.

(२) व (३) ईशान्य महामुंबई स्थित मानखुर्द-शिवाजीनगर या नागरी प्रभागात अपुऱ्या पाणी पुरवठ्याच्या तक्रारींची दखल घेऊन जी.एम.लिंक रोडलगत, पी.एल. लोखंडे मार्गालगत व अहिल्याबाई होळकर मार्गालगत महापालिकेमार्फत नवीन जलवाहिन्या टाकण्याची कामे सुरु असून, सदर कामे दिनांक ३१.०५.२०१७ पर्यंत पूर्ण करण्यात येतील.

---

**मुंबई शहरासाठी कोस्टल रोड वसई-विरारपर्यंत तयार करण्यासंदर्भत**
**शासन आंतरराष्ट्रीय सल्लागारांची मदत घेणार असल्याबाबत**

**(११) ३०२३४ (२१-०१-२०१६). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.अजित पवार (बारामती), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहराची वाहतूक वेगवान व्हावी यासाठी शासनाने कोस्टल रोड वसई-विरारपर्यंत तयार करण्यासाठी आंतरराष्ट्रीय सल्लागारांची मदत घेणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कोस्टल रोडबाबत शासनाने सूचना आणि हरकती मागविल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोस्टल रोड प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या कोळी समाजाकरिता शासनाने कोणती उपाययोजना केली आहे,

(४) तसेच कोस्टल रोड प्रकल्पाला किती खर्च अपेक्षित आहे व प्रकल्प किती वर्षात पूर्ण करण्यात येणार आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०८-२०१६) :**(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेने नरिमन पाईट ते कांदिवली या किनारी रस्त्यासाठी मेसर्स स्टूप कन्सल्टंट + इ एन्ड वाय या तांत्रिक सल्लागाराची नेमणूक केलेली आहे. तसेच प्रारुप प्रकल्प अहवालाच्या पुनर्विलोकनासाठी मे.फ्रिशमन प्रभु या सल्लागाराची नेमणूक करण्यात आली आहे.

(२) प्रश्नाधीन कोस्टल रोडचा विस्तृत प्रकल्प अहवाल हा बृहनमुंबई महानगरपालिकेन महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर जनेतेच्या सूचना / हरकतीसाठी २५ जून, २०१५ रोजी उपलब्ध केलेला होता.

(३) सदर रस्त्याच्या प्रारुप प्रकल्प अहवालामध्ये पर्यावरणीय दृष्टीकोनातून मूल्यमापन करण्यात आलेले आहे. पूर्ण प्रकल्पाचे पुनर्विलोकनासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने सल्लागाराची नेमणूक केलेली आहे. या प्रकरणी प्राप्त झालेल्या तक्रारींचे अवलोकन करणे व नागरीकाच्या सूचना / हरकती विचारात घेवून प्रकल्पाचे पुढील तपशीलवार अंदाजपत्रक / आराखडे बृहन्मुंबई महानगरपालिकेने तयार करणे अभिप्रेत आहे.

(४) कोस्टल रोडच्या बांधकामासाठी रु. १२,००० कोटी इतका खर्च अपेक्षित असून सदर कामास ३ वर्ष कालावधी अपेक्षित आहे.

---

**रायगड जिल्ह्यातील रोहा नगरपालिका शिक्षण मंडळातून निवृत्त झालेल्या शिक्षिकांना निवृत्तीवेतन वेळेत मिळत नसल्याबाबत**

**(१२) ३०४२२ (२१-०१-२०१६). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील रोहा नगरपालिका शिक्षण मंडळातून निवृत्त झालेल्या ७० शिक्षिकांना वेळेवर जीवनवेतन मिळत नसल्याचे नुकतेच माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निवृत्त शिक्षकांना त्यांच्या निवृत्ती वेतनासाठी तब्बल २ ते ३ आठवडे प्रतिक्षा करावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रोहा नगरपालिका शिक्षण मंडळाच्या निष्काळजीपणामुळे सेवानिवृत्तांचे वेतनास विलंब होत आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तसेच सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०८-२०१६) :**(१) हे खरे नाही.

रोहा नगरपालिका शिक्षण मंडळाचे निवृत्तीवेतन अनुदान शिक्षण उपसंचालक, मुंबई यांच्याकडून मिळते. सदर माहे सप्टेंबर २०१५ चे निवृत्तीवेतन दिनांक ०१.०९.२०१५ रोजी अदा करण्यात आले आहे व माहे ऑक्टोबर, २०१५ चे निवृत्तीवेतन दिनांक ०१.१०.२०१५ रोजी अदा करण्यात आले आहे.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर शहरात सी.सी.टीव्ही बसविण्याबाबत**

**(१३) ३०५२२ (२१-०१-२०१६). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर शहरात सी.सी.टीव्ही लावण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हापूर शहरात सी.सी.टीव्ही कॅमेरे बसविणेबाबत शासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०८-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

कोल्हापूर महानगरपालिकेतर्फे कोल्हापूर सेफ सिटी टप्पा क्र.१ या प्रकल्पातर्गत सिसिटीव्ही बसविणेची कार्यवाही पुर्ण होवुन यंत्रणा कार्यान्वीत झाली आहे.

(२) पहिल्या टप्प्यात कोल्हापूर महानगरपालिकेकडून रु.५.५० कोटी इतका निधी व जिल्हा नियोजन समितीकडून र.रु.२.०० कोटी यांचे संयुक्त निधी मधुन शहरातील ६५ ठिकाणी एकूण १३५ कॅमेरे बसविणेत आले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### विरार पूर्व भागात महापालिका क्षेत्रात अनधिकृत बांधकामे सुरु असल्याबाबत

**(१४) ३२२८४ (२१-०१-२०१६). श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विरार पूर्व भागात महापालिका क्षेत्रात अनधिकृत बांधकामे मोठ्या प्रमाणात सुरु असल्याची तक्रार नागरिकांनी दिनांक १५ ऑक्टोंबर, २०१५ व त्या दरम्यान महापालिका आयुक्तांकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीतून काय आढळून आहे, चौकशीत दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे
(४) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०८-२०१६) :**(१) हे खरे आहे.
फुलपाडा जिवदानी रोड, चंदनसार रोड, मनवेलपाडा व कारगिल नगर, विरार (पूर्व) या विभागातील अनधिकृत बांधकामाबाबत तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.
(२) उक्त तक्रारींवर सहा. आयुक्त तथा पदनिर्देशित अधिकारी यांनी प्रत्यक्ष जागेवर पाहणी करुन अनधिकृत बांधकाम धारकांना एमआरटीपी अंतर्गत नोटीसा दिलेल्या आहेत. तसेच ३ गुन्हे दाखल केले असून कायदेशीर प्रक्रियेचा अवलंब करुन निष्कासनाची कार्यवाही करण्यात येत आहे.
काही ठिकाणच्या अवैध बांधकामाना स्थगिती आदेश आहेत. स्थागिती आदेश रद्द करण्याकरीता प्रयत्न करण्यात येत असून स्थगिती आदेश रद्द झाल्यावर निष्कासनाची कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे.
त्याचप्रमाणे काही अवैध इमारतींमध्ये रहिवास आहे. त्यापैकी विरार (पूर्व) कारगील नगर येथील शासकीय जागेवरील अतिक्रमण काढण्यासाठी मा.उच्च न्यायालयाचे दिनांक ३.२.२०१६ रोजी आदेश झाला आहे. त्याठिकाणी असलेल्या रहिवाशांनी मा.उच्च न्यायालयात अपिल दाखल केल्याने मा.उच्च न्यायालयाने स्थगिती आदेश दिलेले आहेत. स्थगिती आदेश उठल्यानंतर कारगील नगर मधील अतिक्रमण महसूल विभागाच्या मदतीने काढण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बेकायदेशीर प्रार्थना स्थळांवर कारवाई करण्यासाठी समिती गठीत करणेबाबत**

**(१५) ३२६८१ (२१-०१-२०१६). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मा.सुप्रीम कोर्टाच्या आदेशानुसार मा. हायकोर्टाने बेकायदेशीर प्रार्थना स्थळांवर कारवाई करण्याचे आदेश दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.हायकोर्टाने माहे मार्च, २००५ ला समन्वय समिती गठीत करण्याचे आदेश असतांना जुलै, २०१५ ला करण्यास झालेल्या विलंबाची कारणे काय,

(३) असल्यास, समितीने घेतलेल्या बैठकीनुसार मा.हायकोर्टास कोणता अहवाल सादर केला आहे,

(४) असल्यास, शासनाच्या धोरणानुसार एकूण किती व कोणती विशिष्ट बेकायदा प्रार्थना स्थळे नियमित केली जाणार आहेत व कोणती स्थलांतर व तोडण्यात येणार आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०८-२०१६) :**(१) होय.

(२) मा.उच्च न्यायालयाने दिनांक १३.०३.२०१५ रोजी अनधिकृत धार्मिक स्थळांवर कार्यवाहीसाठी कालबध्द वेळापत्रक तयार करण्याकरीता समन्वय समिती गठीत करण्याचे आदेश दिले व दिनांक १५.०७.२०१५ च्या शासन निर्णयान्वये समिती गठीत करण्यात आली.

(३) सदर बैठकीत मा.न्यायालयाच्या आदेशानुसार कार्यवाही करण्याबबत नगर विकास विभाग व महसूल व वन विभाग यांना कार्यवाही करण्याबाबत कळविल्याचे सादर करण्यात आले.

(४) दिनांक ०५.०५.२०११ च्या शासन निर्णयानुसार महानगरपालिका क्षेत्रामध्ये दिनांक २९.०९.२००९ पूर्वीची १४५१९ तर दिनांक २९.०९.२००९ नंतरची ८७१ अनधिकृत धार्मिक स्थळे आहेत. तर महानगरपालिका क्षेत्र वगळून इतर जिल्हाधिकारी क्षेत्रात दिनांक २९.०९.२००९ पूर्वीची ४९८४९ तर दिनांक २९.०९.२००९ नंतरची ८४७ अनधिकृत धार्मिक स्थळे आहेत. सदर अनधिकृत धार्मिक स्थाळांचे दिनांक ०५.०५.२०११ च्या शासन निर्णयानुसार वर्गीकरण करुन कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर शहरात पाणीपुरवठा करणारी उजनी ते सोलापूर पाईपलाईन टेंभूर्णीनजीक वेणेगाव पाईपलाईनची दुरुस्ती करण्याबाबत**

**(१६) ३३३५६ (२१-०१-२०१६). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर शहरात पाणीपुरवठा करणारी उजनी ते सोलापूर पाईपलाईन टेंभूर्णीनजीक वेणेगाव येथील ओढ्याच्या पुलाजवळ दिनांक ४ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास फुटली त्यामुळे लाखो लिटर पाणी वाहून वाया गेल्यामुळे सोलापूरच्या पाणी पुरवठ्यावर परिणाम झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी पाईप लाईनची संपूर्ण दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करणार आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०८-२०१६)** :(१) होय, हे खरे आहे.
(२) सदर पाईप लाईनची दुरुस्ती तातडीने त्याच दिवशी हाती घेऊन पाच ते सहा तासात काम पूर्ण करणेत येऊन पाणीपुरवठा चालू करणेत आला.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नगर जिल्हयातील दरोडे रोखण्याबाबत**

**(१७) ३३४३६ (२१-०१-२०१६). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नगर जिल्हयात विविध ठिकाणी दरोडे घालून किंमती ऐवज लुटणे आणि निरपराध लोकांना मारहाण करुन जखमी केल्याच्या घटना माहे जुलै, २०१५ दरम्यान घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दरोडेखोंराना पकडण्यासाठी तसेच सदर घटना रोखण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-११-२०१६)** :(१) अहमदनगर जिल्हयात माहे जुलै २०१५ मध्ये दरोड्याचे ६ गुन्हे दाखल असून त्यापैकी १) कोतवाली पोलीस स्टेशन गु.र.नं. १८२/१५ भा.दं.वि. कलम ३०७, ३९५, २) कोतवाली पो.स्टे. गु.र.नं. १८५/१५ भा.दं.वि. ३०७, ३९५, ३५३, ३) संगमनेर पोलीस स्टेशन गु.र.नं. १५५/१५ भा.दं.वि. कलम ३९५, ४२७ असे ३ दरोड्याचे गुन्हे हे तांत्रीक (Technical) स्वरुपाचे दाखल आहेत.

इतर वास्तविक (Actual) दरोड्याचे गुन्हे पुढील प्रमाणे आहेत. ४) राहाता पो.स्टे. गु.र.नं.६५/१५ भा.दं.वि.कलम ३९५ मध्ये यातील फिर्यादी हे बँकेत पैसे जमा करण्यासाठी जात असताना आरोपी यांनी मोटार सायकलवर येवून मारहाण करुन ऐवज चोरले बाबत गुन्हा दाखल झालेवरुन सदर गुन्हयात ३ आरोपी अटक करण्यात आली आहे. ५) जामखेड पो.स्टे. गु.र.नं.११२/१५ भा.दं.वि.कलम ३९५ मध्ये यातील आरोपी यांनी फिर्यादीच्या घरात प्रवेश करुन मारहाण करुन ऐवज चोरुन नेले बाबत गुन्हा दाखल झालेवरुन सदर गुन्हयात २ आरोपींना अटक करण्यात आली आहे. ६) नेवासा पो.स्टे. गु.र.नं.२२३/१५ भा.दं.वि.कलम १९५ मध्ये यातील आरोपी यांनी फिर्यादी चे घरात प्रवेश करुन मारहाण करुन ऐवज चोरुन नेले बाबत गुन्हा दाखल झालेवरुन सदर गुन्हयात ३ आरोपींना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयांचा सखोल व कसोशीने तपास चालु आहे.

(२) दरोड्यांच्या या ६ गुन्ह्यातील ३३ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

तसेच या दरोड्यांसारखे गुन्हे घडू नये म्हणून जिल्ह्यात दररोज उप विभागीय पोलीस अधिकारी यांचे अधिपत्याखाली उत्तर व दक्षिण जिल्हा रात्रगस्त सुरु असून जिल्ह्यात विविध महत्वाचे ठिकाणी नाकाबंदी करण्यात येत असून त्याद्वारे संशयीत इसम व वाहने चेक करण्यात येत आहेत. तसेच गुन्हेगारी वस्त्यांवर कोंबीग ऑपरेशन राबविण्यात येत आहे. जिल्ह्यातील रेकॉर्डवरील गुन्हेगारांना वेळोवेळी चेक करुन त्यांचेवर योग्य ती प्रतिबंधक कार्यवाही करण्यात येत असून स्वतंत्र दरोडा प्रतिबंधक पथक स्थापन करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई उपनगर अंधेरी (प.) येथील महापालिकेच्या "के पश्चिम" विभागातील शहाजी राजे क्रिडा संकूल व शॉपिंग सेंटर करीता आरक्षित असलेल्या भू भागावरील आरक्षणात फेरबदल केल्याबाबत**

**(१८) ३३६३६ (२१-०१-२०१६). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगर अंधेरी (प.) येथील महापालिकेच्या "के पश्चिम" विभागातील आंबिवली गावातील सर्वे क्र.२३ मधील न.भू.क्र. ८०१ व अन्य शहाजी राजे क्रिडा संकूल व शॉपिंग सेंटर करीता आरक्षित असलेल्या भू भागावरील आरक्षणात फेरबदल करुन क्रीडा संकुल नाट्यगृह आणि सांस्कृतिक व इतर संलग्न वापर करणेबाबतच्या महापालिकेने सन २०१४ मध्ये सादर केलेल्या प्रस्तावास अद्यापही शासनाने मंजूरी दिली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रलंबित प्रस्तावास शासनाने तातडीने मंजुरी द्यावी यासाठी मा.मुख्यमंत्री, मा.प्रधान सचिव, महाराष्ट्र राज्य.यांना लोकप्रतिनिधींनी दिनांक ७ सप्टेंबर, २०१५ रोजी लेखी निवेदन दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने प्रलंबित प्रस्तावास त्वरीत मंजूरी देणेबाबत अद्याप कोणती कार्यवाही केली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०८-२०१६) :**(१) हे खरे नाही.

आंबिवली, अंधेरी (प) येथील न.भू.क्र. ८०१ व इतर जमिनीवर शहाजीराजे क्रिडा संकुल अस्तित्वात आहे. मंजूर विकास आराखड्यानुसार सदर भूखंडावर क्रिडा संकुल व शॉपिंग सेंटर असे आरक्षण असून शॉपिंग सेंटर या आरक्षणात फेरबदल करुन जमिन महापालिका क्रिडा संकुल, नाट्यगृह आणि सांस्कृतिक केंद्र व इतर संलग्न वापर असा फेरबदल प्रस्ताव बृहनमुंबई महापालिकेने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियमाचे कलम ३७ (१) अन्वये फेरबदलाची वैधानिक कार्यवाही पूर्ण करुन मंजूरीस्तव शासनाने मंजूरी दिली आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियमाचे कलम ३७(२) अन्वये अधिसूचना निर्गमित करण्यात येत आहे.

(२) होय.

(३) बृहन्मुंबई महापालिकेने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियमाचे कलम ३७(१) अन्वये फेरबदलाची वैधानिक कार्यवाही पूर्ण करुन मंजूरीस्तव शासनास सादर केलेल्या फेरबदल प्रस्तावास शासनाने मंजूरी दिली आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियमाचे कलम ३७(२) अन्वये अधिसूचना निर्गमित करण्यात येत आहे.

(४) अशी बाब नाही.

---

**ठाणे महानगरपालिकेचे तत्कालीन आयुक्त यांनी आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करुन केलेल्या बेकायदेशीर कारवाईची चौकशी करण्याबाबत**

**(१९) ३४७९८ (२१-०१-२०१६). श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिकेचे तत्कालीन आयुक्त श्री आर ए राजीव यांनी आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करुन केलेल्या बेकायदेशीर कारवाईची निवृत्त न्यायाधीशामार्फत चौकशी करण्याबाबत तेथील लोकप्रतिनिधींनी दिनांक २५ मार्च २०१५ व दि. २० ऑक्टोबर २०१५ रोजी वा त्या सुमारास तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तक्रारीनुसार संबंधितांवर चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०८-२०१६) :**(१) व (२) होय, हे खरे आहे.

सदर प्रकरणी विभागीय आयुक्त कोकण विभाग यांचा अहवाल प्राप्त झाला असून, उक्त अहवाल विचारात घेता या प्रकरणी अधिक चौकशीची आवश्यकता दिसून येत नसल्याने प्रकरणी नस्ती बंद करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**घोडबंदर (जिल्हा ठाणे) रोडवरील कासारवडवली ओवळा भाईंदरपाडा व गायमुख्य येथे पादचारी पुलाची निर्मिती करुन त्या खालील मोकळया जागेत सार्वजनिक शौचालय बांधण्याबाबत**

**(२०) ३४८०४ (२१-०१-२०१६). श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घोडबंदर (जिल्हा ठाणे) रोडवरील कासारवडवली ओवळा भाईंदरपाडा व गायमुख्य येथे पादचारी पुलाची निर्मिती करुन त्या खालील मोकळया जागेत सार्वजनिक शौचालय बांधण्याबाबत तेथील लोकप्रतिनिधींनी दिनांक ४ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येते आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०८-२०१६)** :(१) होय.
(२) घोडबंदर रस्त्यावर तत्वज्ञान विद्यापीठ, आरमॉल, ब्रम्हांड जंक्शन, कासारवडवली येथे पहिल्या टप्प्यांमध्ये चार पादचारी पुल बांधणेचे काम महापालिकेने हाती घेतले असून ही कामे सुरु आहेत. त्यापैकी कासारवडवली येथील काम माहे डिसेंबर, २०१६ अखेर पूर्ण होणार आहे.

या व्यतिरिक्त डोंगरी पाडा, मुच्छाला पॉलिटेक्निक, ओवळा भाईदरपाडा व गायमुख घाट या पाच ठिकाणी पादचारी पूल बांधणेच्या प्रस्तावास जानेवारी, २०१६ मध्ये महासभेची मान्यता प्राप्त झाली आहे. या सर्व नऊ पुलाच्या रॅम्प खाली सार्वजनिक शौचालय बीओटी तत्वावर बांधणे विचाराधीन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### नाशिक जिल्ह्यातील सप्तशृंग गडावर फनिकुलर ट्रॉलिचा प्रकल्प प्रलंबित असल्याबाबत

**(२१) ३६६४७ (२१-१२-२०१५). डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्ह्यातील सप्तशृंगी मातेचे दर्शन घेण्यासाठी भाविकांना सहजरित्या आणि विनाकष्टाचे व्हावे या उद्देशाने सदर गडावर फनिकुलर ट्रॉलिचा प्रकल्प गत पाच वर्षापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्प पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२५-०७-२०१६)** :(१) होय.
(२) i) विषयांकित काम विहीत मुदतीत पूर्ण न केल्यामुळे उद्योजकास दि. १२/०७/२०११ पासून प्रतिदिन रु. २५,०००/- प्रमाणे Liquidated Damages लागू करण्यात आला आहे.
ii) सद्या सदर प्रकरण लवादात गेले असून लवादाच्या निर्णय नंतर पुढील कार्यवाही निश्चित करता येईल.
iii) सदर प्रकल्प सद्यस्थितीत प्रगतीत असून मार्च, २०१७ अखेर पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लोकनेते बाळासाहेब देसाई यांचे कोल्हापूर येथील पुर्णाकृती पुतळ्याच्या सुशोभिकरणासाठी मंजूर निधी इतत्र वापरल्याबाबत**

**(२२) ३६९३४ (२१-०१-२०१६). श्री.शंभूराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याचे माजी गृहमंत्री लोकनेते बाळासाहेब देसाई यांचे कोल्हापूर येथील पुर्णाकृती पुतळ्याच्या सुशोभिकरणाकरीता राज्य शासनाच्या नगर विकास विभागाने सन २००८ मध्ये कोल्हापुर नगरपालिकेला २० लक्ष रुपयांचा निधी मंजुरी केला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनास नगर विकास विभागाने कोल्हापुर नगरपालिकेला सदरचा २० लक्ष रुपयांचा निधी हा तातडीने पुतळयाच्या सुशोभिकरणाकरीता खर्च करण्याचे आदेश दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोल्हापूर नगरपालिकेने सदरचा निधी लोकनेते बाळासाहेब देसाई यांच्या पुतळ्याच्या सुशोभिकरणाकरीता मंजुर असताना तो इतरत्र खर्च केला असल्याने मंजुर झालेल्या कामांला तो मिळाला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्य शासनाने यासंदर्भात चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळले तसेच सदर पुतळयाचे सुशोभिकरणासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०८-२०१६) :**(१), (२) व (३) हे खरे नाही.

(४) या संदर्भात महानगरपालिका सन २०१५-१६ मधील सुधारित अंदाजपत्रकामध्ये सदरचा पुतळा सुशोभिकरणासाठी रु. २०.०० लाख इतकी तरतुद प्रस्तावीत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाण्यातील 'कृष्णा निवास' या इमारतीच्या दुर्घटनेनंतर ठाणे शहरातील धोकादायक इमारतींचे सर्वेक्षण करण्याबाबत**

**(२३) ३७८९७ (२१-०१-२०१६). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाण्यातील 'कृष्णा निवास' या इमारतीच्या दुर्घटनेनंतर ठाणे शहरातील धोकादायक इमारतींचे सर्वेक्षण महानगरपालिका वा शासनाच्या नगरविकास विभागाने पूर्ण केले आहे काय,

(२) असल्यास, त्यात किती धोकादायक व अतिधोकादायक इमारती आढळून आल्या आहेत, सदर इमारती खाली करुन त्यांचे पुनर्वसन करण्याच्या कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे,

(३) असल्यास, ठाणे शहरातील जुन्या व मोडकळीस आलेल्या धोकादायक व अतिधोकादायक इमारतींचे क्लस्टर डेव्हलेपमेन्ट अंतर्गत विकास करण्यासाठी न्यायालयाकडे स्थगिती इम्पॅक्ट अहवाल तातडीने ठाणे महानगरपालिकेने सादर करावा असा निर्णय ठाण्याचे मा.पालकमंत्री व ठाणे महानगरपालिका यांच्या दि.०७/०८/२०१५ रोजीच्या बैठकीत घेण्यात आला हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबतची सद्यःस्थिती काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०८-२०१६) :**(१) ठाणे महानगरपालिका हद्दीतील जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींचे सर्वेक्षण दरवर्षी करण्यात येऊन सदर इमारतींची यादी वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात येते.

सन २०१६ मध्ये सदरची कार्यवाही सुरु आहे. सदरची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर सदर इमारतींची यादी वृत्तपत्रात लवकरच प्रसिध्द करण्यात येईल.
(२) सन २०१५ मध्ये केलेल्या सर्वेक्षणानुसार ठाणे महानगरपालिका हद्दीतील जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींपैकी २६४० धोकादायक व ५८ अतिधोकादायक इमारती आढळून आलेल्या आहेत.

शासनाने दिलेल्या निर्देशानुसार मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून दोस्ती कॉर्पोरेशन प्रा.लि. यांचेमार्फत रेंटल हाऊसिंग स्कीम अंतर्गत वर्तकनगर येथे बांधण्यात आलेल्या दोस्ती विहारमधील १४४८ सदनिकांमध्ये भाडेतत्वावर देण्यात येत आहे. त्यामध्ये विविध ठिकाणच्या १३६७ कुटूंबांना उपरोक्त इमारतींमध्ये भाडेकरारानुसार स्थलांतरित करण्यात आले आहे.
(३) व (४) आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांनी ठाणे शहराच्या मंजुर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये नागरी नुतनीकरण योजनेचा (Urban Renewal Cluster Development) अंतर्भाव करण्याकरिताचे शासनास सादर केलेल्या प्रारुपामध्ये शासनाने आवश्यक ते बदल करुन सदर विनियम मंजुर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये अंतर्भूत करणेकामी व सदर फेरबदल प्रस्तावास आम जनतेकडून हरकती / सुचना मागविण्याचे कलम ३७(१अेअे) ची सुचना शासनाने दि.४/३/२०१४ रोजी प्रसिध्द केला आहे. सदर सुचनेवर प्राप्त हरकती / सुचना, नियुक्त अधिकारी यांचा अहवाल व त्यावरील संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे प्राप्त अभिप्राय तसेच ठाणे महानगरपालिकेने सादर केलेला इम्पॅक्ट असेसमेंट रिपोर्ट विचारात घेऊन निर्णय घेण्याची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

**नागपूर शहरात बनावट मेट्रो रेल्वे भरती बोर्डाच्या माध्यमातुन बेरोजगारांची फसवणुक करण्यात आल्याबाबत**

**(२४) ३९९३७ (२०-०५-२०१६). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर शहरात बनावट मेट्रो रेल्वे भरती बोर्ड थाटून अनेक बेरोजगारांची फसवणुक झालेली असून बेरोजगारांनी कळमना पोलीस स्टेशन येथे तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०७-२०१६)** :(१) होय, हे खरे आहे.
(२) सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे. आरोपींनी फिर्यादी व इतर लोकांची नागपूर मेट्रो रेल्वे कंपनीत नोकरी लावण्यचे आमिष दाखवून एकुण १,७२,०००/- रुपयाची फसवणुक केली आहे. फिर्यादीचे रिपोर्टवरुन आरोपीतांविरुध्द कळमना पोलीस स्टेशन येथे अपराध क्रमांक ४७२/२०१५ कलम ४२०, ३४ भा.द.वि. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला असुन सदर गुन्ह्याचे तपासामध्ये एकुण ६ आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. आरोपीतांविरुध्द साक्षी पुरावे गोळा करुन मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून सदरचा गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे शहरात सन २०१५ या वर्षाभरात टँकरच्या धडकेत १९ नागरिकांचे बळी गेले असल्याबाबत**

**(२५) ४०४३५ (२८-०४-२०१६). श्रीमती मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरात सन २०१५ या वर्षाभरात टँकरच्या धडकेत १९ नागरिकांचे बळी गेले असल्याचे निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बेजबाबदारपणे टँकर चालवणाऱ्या टँकर चालकावर व संबंधीत ठेकेदारावर काय कारवाई करण्यात आली तसेच शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास,चौकशीअंती संबंधीत टँकर चालकावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?
(४) नसल्यास, त्याच्या विलंबाची कारणे कोणती ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०७-२०१६)** :(१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) सन २०१५ मध्ये टँकर अपघातामध्ये १९ नागरीकांचे बळी गेले असून या प्रकरणी संबंधित दोषी टँकर चालकांविरुध्द संबंधित पोलीस ठाण्यास एकूण १७ दखलपात्र गुन्हे दाखल आहेत. यापैकी १५ प्रकरणांमध्ये दोषी टँकर चालकांना अटक करुन त्यांच्याविरुध्द संबंधित न्यायालयामध्ये दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.तर दोन गुन्हे तपासावर प्रलंबित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील पर्यटकांसाठी जुहू ते गिरगाव चौपाटी दरम्यानचा जलवाहतूक सुरु करण्याबाबत**

**(२६) ४०५५८ (२०-०५-२०१६). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील पर्यटकांसाठी जुहू ते गिरगाव चौपाटी दरम्यान जलवाहतूक सुरु करण्यासंबंधी शासनाने यापूर्वीच निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, अद्यापपर्यंत या सेवेला काही परवानग्या मिळाल्या नसल्याने ही सेवा अद्यापपर्यंत सुरु झाली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर जलवाहतूक सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०८-२०१६) :**(१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील गिरणी कामगारांच्या प्रलंबित समस्यांबाबत**

**(२७) ४०९३२ (०७-०५-२०१६). श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुबईतील कामगारांच्या संघटनांनी, कामगारांसाठी मा.उच्च न्यायालय आणि मा.सर्वोच्च न्यायालयात, कायदेशीर लढा दिल्यानंतर म्हाडाच्या ताब्यात आलेल्या मुंबईतील वडाळा येथील बॉम्बे डाईंगची ३३८२२ चौ.मी. जमिनीवर शासनाने तथा मुंबई महापालिकेने २०१४-३४ च्या विकास आराखडयात रस्ता, खेळ आणि मनोरंजन मैदानाचे आरक्षण टाकले असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच राज्यातील गिरणी कामगारांच्या पुढील घरांची लॉटरी काढणे, ताब्यात असलेल्या जमीनीवर बांधकाम सुरु करण्याचा आदेश म्हाडाला देणे, बॉम्बे डाईंगच्या जमिनीवरील आरक्षण उठविणे आदि प्रलंबित समस्यांबाबत दिनांक १० जानेवारी, २०१५ रोजी ललित कला भवन, डिलाईड रोड, पोलिस स्टेशन जवळ गिरणी कामगारांनी धरणे आंदोलन केले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर गिरणी कामगारांच्या समस्या सोडविणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०८-२०१६) :**(१) ते (४) बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिनांक २५.२.२०१५ रोजी प्रसिध्द केलेल्या सुधारित प्रारुप विकास योजनेमध्ये बॉम्बे डाईंग मिल संदर्भात म्हाडाच्या हिश्श्याच्या क्षेत्रावर आरक्षणे प्रस्तावित केलेली असल्याने गिरणी कामगारांच्या गृह निर्माण प्रकल्पास अडचण निर्माण झालेली होती.

बृहन्मुंबई महानगरपालिकेने प्रसिध्द केलेल्या सुधारित प्रारुप विकास योजनेमध्ये मोठ्या प्रमाणावर चुका असल्याचे निदर्शनास आल्याने शासनाने दिनांक २३.०४.२०१५ रोजी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम १५४ अन्वये प्रारुप विकास आराखड्यामधील चुकांची दुरुस्ती करुन महानगरपालिकेच्या पूर्वमान्यतेने प्रारुप विकास आराखडा नागरिकांच्या सूचना / हरकतीसाठी पुन:प्रसिध्द करण्याचे निर्देश दिलेले होते.

त्यानुसार सुधारित प्रारुप विकास योजना बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून दिनांक २७.५.२०१६ रोजी पुर्नप्रसिध्द करणेत आलेली आहे. त्यामध्ये संदर्भाधीन भूभागावर आरक्षणे दर्शविण्यात आलेली नाहीत. म्हाडाकडून अभिन्यासचा प्रस्ताव सादर झाल्यावर महानगरपालिकेडून कार्यवाही होऊ शकेल.

---

**पुणे शहरात पर्यायी रस्त्यांचा अभाव व उड्डाणपुलांच्या प्रलंबित कामांमुळे शहरातील वाहतुकीची समस्याबाबत तीव्र झाल्याबाबत**

**(२८) ४१२६३ (१६-०५-२०१६). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरात पर्यायी रस्त्यांचा अभाव व उड्डाणपुलांच्या रखडलेल्या कामांमुळे शहरातील वाहतुकीची समस्या तीव्र बनली असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रमुख चौकांमध्ये गेल्या अनेक वर्षांपासून शहरातील उड्डाणपुलांचे कामे रखडले आहे. कोथरुड, डेक्कन चौक, संचेती इस्पितळाजवळील पूल, स्वारगेट चौक, पौड मार्ग, कर्वे मार्ग, सिंहगड, एनआयबीएम मार्ग हे भाग वाहतुकीच्या कोंडीचे प्रमुख केंद्र असून या भागातील होणाऱ्या कोंडीमुळे ध्वनी व वायू प्रदूषणात पूर्वीपेक्षा अधिक भर पडली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०९-२०१६) :**(१) अंशतः खरे आहे.

परंतु ज्या चौकांमध्ये उड्डाणपूलांची कामे चालू आहेत त्या ठिकाणी गर्दीच्या वेळी काही प्रमाणात वाहतुकीची कोंडी होते.

(२) व (३) नाही.

तथापि नमूद पैकी संचेती इस्पितळाजवळील अभियांत्रिकी महविद्यालय चौक, स्वारगेट चौक, (कमिन्स कॉलेज) येथे उड्डाणपूलांची कामे चालू आहेत. त्यापैकी स्वारगेट उड्डाणपूलाचे काम दिनांक २७ मे २०१६ रोजी पूर्ण होवून सदरचा उड्डाणपूल वाहतुकीसाठी खुला करणेत आलेला आहे. अभियांत्रिकी महाविद्यालय चौक व कमिन्स कॉलेज चौक येथील कामे प्रगतीपथावर आहेत.

वाहतुकीस खुला करण्यात आलेल्या उड्डानपुलामुळे वेळ व इंधनाची बचत होत असल्याचे व वायुप्रदुषण कमी झाल्याचे निदर्शनास आलेले आहे.

(४) उड्डाणपूलाच्या कामामध्ये पुलाच्या आखणी अंतर्गत पूर्ण रस्तारुंदी क्षेत्र उपलब्ध नसणे, रस्त्यावर अतिक्रमणे असणे, पुलाच्या आखणीमध्ये येणारे विद्युत पोल, झाडे, ड्रेनेज व पाण्याच्या लाईन हलविणे त्याचप्रमाणे पुलाचे काम चालू असताना वाहतुक पोलिसांची परवानगी घेणे, काम सुरु असताना टप्पेनिहाय वाहतुक वळवुन काम करणे इत्यादी विविध

प्रकारच्या अडचणी दूर करणेत येत असतात. ज्या ठिकाणी उपरोक्त कारणांमुळे उड्डाणपुलाचे काम प्रशासकीय अडचणीमुळे हाती घेता येत नाही त्या ठिकाणी प्रशासकी अडचणींमुळे कामास विलंब होतो तेथे कामास मुदतवाढ द्यावी लागते.

---

**वसई-विरार महानगरपालिकेतील २९ गावे वगळण्याबाबत**

**(२९) ४२२९१ (०५-०५-२०१६). ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार महानगरपालिकेतील २९ गावे वगळण्यासाठी ग्रामस्थांचा लढा उच्च न्यायालयात सुरु असताना शासनाने अचानक ही गावे वगळण्याचा अध्यादेश रद्द केला असल्याने वसई-विरार मधील विविध राजकीय पक्षानी आणि सर्वसामान्य नागरीकांच्या विविध संघटना पदाधिकारी तसेच इतर संघटनेच्या कार्यकर्त्यांनी शासनाच्या विरोधात माहे जानेवारी, २०१६ वा त्यासुमारास आंदोलन केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणता निर्णय घेतला व घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप व व्याप्ती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे कोणती आणि याबाबतीत निर्णय किती कालावधीत घेतला जाण्याचे अपेक्षीत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-१०-२०१६) :**(१), (२) व (३) सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ असून, २९ गावे वसई विरार शहर महानगरपालिकेच्या हद्दीत समाविष्ट करण्याचा शासनाचा निर्णय मा.उच्च न्यायालयास शपथ पत्राद्वारे अवगत करण्यात आला आहे.

---

**राज्यात पत्रकारांवर होणारे हल्ले रोखण्यासाठी पत्रकार हल्ला प्रतिबंधक कायदा तयार करण्याबाबत**

**(३०) ४२३१३ (१७-०५-२०१६). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा), ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पत्रकारांवर होणारे हल्ले रोखण्यासाठी पत्रकार हल्ला प्रतिबंधक कायदा तयार करण्याची बाब तसेच पत्रकांरांना निवृत्तीवेतन योजना व आरोग्य विमा योजना राबविण्याची बाबही शासनाच्या विचारधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बाबींवर निर्णय घेण्यात आला आहे काय, असल्यास निर्णयाचे स्वरुप काय आहे व तद्नुसार कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०८-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) राज्यात पत्रकारांवर होणारे हल्ले रोखण्यासाठी पत्रकार हल्ला प्रतिबंधक कायद्याचा मसूदा तयार करण्यात आला असून त्यास मंत्रिमंडळाची मान्यता घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

पत्रकारांना निवृत्तीवेतन योजना लागू करण्याकरिता शासनामार्फत विविध पर्यायांची पडताळणी करण्यात येत आहे.

महात्मा ज्योतीबा फुले जीवनदायी आरोग्य योजना दि. २ ऑक्टोबर २०१६ पासून नविन स्वरुपात संपूर्ण राज्यात लागू करण्यात आली असून लाभार्थी मध्ये अधिस्विकृतीधारक पत्रकार व त्यांच्यावर अवलंबून असणारी कुटुंबे यांचा समावेश करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे महापालिका शिक्षण मंडळाच्या शाळेत अनुंकपा तत्वावर नोकरी मिळण्याबाबत**

**(३१) ४२५८८ (१५-०५-२०१६). डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे महापालिका शिक्षण मंडळाच्या शाळेत नोकरीला असलेल्या शिक्षक, शिपाई, रखवालदार यांचा अकस्मात मृत्यू आल्यानंतर त्यांच्याजागेवर अनुंकपा तत्वावर नोकरी मिळावी यासाठी सुमारे १५ वर्षापासून ४६ जण प्रतिक्षेत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, येथील अनुकंपाधारकांना सेवेत सामावून घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०९-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) सदर अनुकंपाधारकांना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार सेवेत सामावून घेण्याबाबत शिक्षण मंडळाने ठराव क्रमांक २०१, दिनांक २८.१.२०१६ पारित केला असून, सदर ठरावानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील १५ क्षेत्रीय कार्यालयाच्या परिसरात तब्बल ९१० धोकादायक पध्दतीची मॅनहोल असल्याबाबत**

**(३२) ४२६३८ (०७-०५-२०१६). डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील १५ क्षेत्रीय कार्यालयाच्या परिसरात तब्बल ९१० धोकादायक पध्दतीची मॅनहोल आढळून आली असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मॅनहोलच्या दुरुस्तीसाठी सुमारे साडेतीन कोटी रुपयांची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कामासाठी निधीला मंजूरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०९-२०१६) :**(१) होय.

(२) होय.

(३) पुणे महानगरपालिकेमार्फत काढलेल्या क्षेत्रिय कार्यालय निहाय देखभाल दुरुस्ती विषयक निविदामधून धोकादायक चेंबर्सची दुरुस्ती करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोल्हापूर शहरातील महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेवरील अतिक्रमणाबाबत**

**(३३) ४३१५४ (०३-०५-२०१६). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर शहरातील महानगरपालिकेच्या मालकीच्या, आरक्षणे, विविध सामाजिक संस्था, ट्रस्ट, कायदेशीर वाद आदि मध्ये अडकलेल्या किमान तीन हजार जागा हडपण्याचा प्रयत्न होत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०९-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोल्हापूर शहरात महानगरपालिकेची बोगस “एनओसी” देणारी टोळी कार्यरत असल्याबाबत**

**(३४) ४३३३२ (१३-०५-२०१६). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर शहरात सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत केल्या जाणाऱ्या विविध प्रकारच्या विकास कामांना महानगरपालिकेची बोगस “एनओसी” देणारी एक टोळी कार्यरत असल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बोगस टोळीमुळे शासनाचा मोठ्या प्रमाणावरील निधी महानगरपालिकेच्या संमतीविना खाजगी जागेत खर्च झाल्याचे निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरच्या निधीच्या गैरव्यवहाराबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व तद्नुसार शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विंलबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०९-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नवी मुंबई क्षेत्रातील गावठाणात गरजेपोटी केलेल्या बांधकामाबाबत**

**(३५) ४४१३९ (१७-०५-२०१६). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई प्रकल्पग्रस्तांच्या गावठाणातील गरजेपोटी केलेल्या बांधकामांबाबत क्लस्टर योजनेऐवजी प्रकल्पग्रस्तांच्या हिताची नविन योजना आणावी म्हणून स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे ऑक्टोंबर, २०१५ मध्ये मा.मुख्यमंत्री महोदयांना दिलेल्या निवेदनावर शासनाचा विचार पूर्ण झाला आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार नविन योजना आणण्याबाबत काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे, तसेच आघात मुल्यमापन अहवालाच्या पुर्ततेसंदर्भात सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०८-२०१६) :**(१) ते (३) यासंदर्भात नवी मुंबई महानगरपालिका व सिडको यांचेकडून आघात मूल्यमापन अहवाल (Impact Assessment Report) शासनास आता प्राप्त झालेले असून त्याची पडताळणी करुन तसेच स्थानिकलोकप्रतिनिधी यांचे निवेदन विचारात घेवून यांसदर्भात अंतिम कार्यवाही संकल्पित आहे.

---

### मुंबई शहर व उपनगराचा सन २०१४-३४ या नवीन विकास आराखड्याबाबत

**(३६) ४५१८६ (१३-०५-२०१६). श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहर व उपनगराचा सन २०१४-३४ या २० वर्षाचा नवीन विकास आराखडा मुंबई महानगरपालिकेने तयार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने सदर विकास आराखड्यास मंजूरी दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई महानगरपालिकेने तयार केलेल्या विकास आराखड्यात सन १९९१ च्या आराखड्यानुसार असलेली धार्मिक स्थळांची आरक्षणे वगळली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर विकास आराखड्यातील सन १९९१ च्या आराखड्यानुसार असलेली धार्मिक स्थळांची आरक्षणे ठेवावी अशी मागणी नगरसेवक, आमदार व नागरिकांनी मुंबई महानगरपालिकेकडे व शासनाकडे माहे नोव्हेंबर, २०१५ मध्ये वा त्या सुमारास केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, शासनामार्फत याबाबत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०८-२०१६) :**(१) होय.

(२) नाही.

(३) ते (६) बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिनांक २५.२.२०१५ रोजी प्रसिध्द केलेल्या प्रारुप सुधारित विकास योजनेस समाजाच्या सर्व स्तरावरुन विरोध होवून विस्तृत प्रमाणात हरकती प्राप्त झालेल्या होत्या. सदर प्रारुप विकास योजनेमध्ये आरेखनाच्या चुकांसहीत इतरही चुका मोठ्या प्रमाणावर झालेल्या होत्या. शासनाने प्रारुप विकास योजनेमधील चुकांची सखोल शहानिशा करुन सगळ्या चुकांची जागेवरील परिस्थितीनुसार, गुणवत्तेनुसार, नियोजनाचे दृष्टीने व कायदेशीर बाबी तपासून त्यानुरुप दुरुस्ती करुन सुधारित प्रारुप विकास योजना पुनप्रसिध्द करणेचे निदेश दिनांक २३.४.२०१५ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिकेस दिलेले आहेत. दि. २७.०५.२०१६ रोजी विकास योजना महानगरपालिकेने पुर्नप्रसिध्द केली असून त्यावर सूचना व हरकती दाखल होणेची प्रक्रिया त्यावर सूचना व हरकती दाखल होणेची प्रक्रिया चालू आहे.

---

### पालघर जिल्हयातील प्रस्तावित डहाणू बंदर निर्मिती संदर्भातील करारा बाबत

**(३७) ४५२२६ (२०-०५-२०१६). श्री.विलास तरे (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हयातील प्रस्तावित डहाणू बंदर संदर्भातील करारावर जे.एन.पी.टी. व महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांनी स्वाक्षऱ्या केल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१५ च्या तिसऱ्या आठवडयात निर्दशनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बंदराची क्षमता १०० मिलीयन टनाची राहणार असून गुजरात मधील मुंद्र बंदराप्रमाणे असल्याने देशातील मल्टीकार्गो बंदर म्हणून उदयास येणार आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त बंदराची जागा डहाणू किनार पट्टीच्या उत्तरेकडे ४.५ नॉटिकल माईलल्सवर आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रस्तावित डहाणू बंदरासाठी सहा हजार कोटीची गुंतवणूक अपेक्षित असुन यात शासनाचा वाटा राहणार असुन बंदर तीन वर्षात पूर्ण होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या बंदरामध्ये राज्यातील उद्योजकांना व ८० टक्के स्थानिक बेरोजगारांना काम मिळणार आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, याबाबत शासनाने काही कृती आराखडा तयार केला आहे काय, असल्यास, त्याचे थोडक्यात स्वरुप काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०८-२०१६) :**(१) डहाणू तालुक्यात वाढवण येथे बंदर प्रकल्प निर्माण करण्याकरिता शासनाच्या मान्यतेअंती जवाहरलाल नेहरुन बंदर विश्वस्त (जे.एन.पी.टी.) व महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांच्यामध्ये दिनांक ५.६.२०१५ रोजी परस्पर सामंजस्य करार (MOU) आणि त्यानंतर दिनांक १४.०४.२०१६ रोजी भागधारक करारनामा (Share Holder Agreement) स्वाक्षांकित करण्यात आला आहे.
(२) होय. वाढवण बंदराचा विकास टप्प्या-टप्प्याने करण्यात येणार असून पहिल्या टप्प्यात १४.६१ मिलीयन टन इतकी मालहाताळणी अपेक्षित असून टप्पानिहाय वाढ होऊन शेवटच्या टप्पयात २५३.८७ मिलियन टन इतकी मालहाताळणी अपेक्षित आहे.
(३) होय.
(४) अंशत: खरे आहे बंदराच्या तांत्रिक आर्थिक सुसाध्यता अहवालानुसार, बंदर प्रकल्पात एकूण रु. २५९३८ कोटी इतकी गुंतवणूक टप्प्याटप्प्याने करण्यात येणार आहे. वाढवण बंदर प्रकल्पात जवाहरलाल नेहरु बंदर विश्वस्त यांचा ७४% तर महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाचा २६% समभाग (Equity Share) राहणार आहे.
(५) व (६) वाढवण बंदर प्रकल्पाच्या माध्यमातून स्थानिक जनेतेकरीता रोजगाराच्या संधी तसेच उद्योजकांसाठी बंदरावर आधारित विविध व्यवसायांकरीता संधी उपलब्ध होणार आहेत. तथापि, बंदर प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याची कार्यवाही जवाहरलाल नेहरुन बंदर विश्वस्त यांच्यामार्फत करण्यात येत आहे.

---

**यंत्रमाग व्यवसायातील कामगारांसाठी शासनाने जाहिर केलेल्या सुधारित किमान वेतनाची अंमलबजावणी करण्याबाबत**

**(३८) ४५३१२ (१३-०५-२०१६). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यंत्रमाग व्यवसायातील कामगारांसाठी शासनाने जाहिर केलेल्या सुधारित किमान वेतनाची अंमलबजावणी करण्याच्या मागणीकरीता लाल बावडा सायझिंग-वार्पिंग कामगार संघटनेने माहे जुलै, २०१५ मध्ये वा त्या सुमारास बेमुदत संपावर जाण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, त्यांचे स्वरुप काय आहे,

(३) अद्याप निर्णय घेतला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (२७-०७-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) इचलकरंजी येथील विविध आस्थापनांना भेटी देऊन किमान वेतन दिले जाते किंवा नाही याबाबत निरीक्षण शेरे पारित करुन २ आस्थापनांच्या विरुध्द न्यायालयात खटले दाखल केले आहेत. तसेच संपाच्या कालावधीत शासनस्तरावर तसेच जिल्हाधिकारी कोल्हापूर, जिल्हा पोलीस प्रमुख, कोल्हापूर, सहायक कामगार आयुक्त कार्यालयामार्फत वेळोवेळी बैठका घेण्यात आल्या. किमान वेतन संदर्भात कामगार आयुक्त कर्यालयाकडे सुमारे १४०० दावे (क्लेम ॲप्लीकेशन्स) दाखल झाले असून त्यावर किमान वेतन कायद्यातील तरतुदीनुसार पुढील कार्यवाही करण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाशी जुहूगाव नवी मुंबई येथील मरिन सेंटर संस्थेतर्फे एके ४७ व एसएल आर सारख्या घातक शस्त्रास्त्रांचे प्रशिक्षण देण्याचा दावा करुन दिलेली बोगस प्रमाणपत्रे जप्त करण्याबाबत**

**(३९) ४६५७१ (१७-०५-२०१६). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.अनिल कदम (निफाड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशी जुहुगाव, नवी मुंबई येथील श्री पार्थो दास यांची मरिन सेंटर ही संस्था एके ४७ व एस.एल.आर. सारख्या घातक शस्त्रास्त्रांचे प्रशिक्षण देण्याचा दावा करुन विद्यार्थ्यांची व पालकांची दिशाभूल करीत असल्यामुळे ही बोगस प्रमाणपत्रे ज्या विद्यार्थ्यांना देण्यात आली ती सर्व प्रमाणपत्रे जप्त करण्याबाबत लोकप्रतिनिधी, अचलपूर यांनी राज्याचे पोलीस महासंचालक यांचेकडे दिनांक १९ जानेवारी, २०१६ रोजी वा त्या दरम्यान लेखी पत्र लिहून मागणी केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली व त्यानुसार आतापर्यंत किती प्रमाणपत्रे जप्त करण्यात आली आहेत, तसेच मरीन सेंटर या संस्था व श्री.पार्थोदास या संस्थाचालकावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच अशा बोगस संस्था, अभ्यासक्रम, प्रमाणपत्रे यांच्यावर नियंत्रण ठेवण्याकरीता कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०७-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) सदर प्राप्त झालेल्या तक्रार अर्जातील तक्रारीच्या अनुषंगाने यापुर्वी तक्रारदार श्री.संतोषकुमार वासुदेवन यांनी पार्थो निरद दास यांचे विरुध्द फिर्याद दिल्याने कळंबोली पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि.नं.३६/२०१५ भा.द.वि. कलम ४२० अन्वये गुन्हा दाखल झालेला आहे. आरोपीविरुध्द साक्षी पुरावे गोळा करुन मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असुन सदरचा गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.
(३) अशा प्रकारची बोगस प्रमाणपत्रे देणारे संस्थाबाबत माहिती मिळून येताच त्या संस्थाविरुध्द कारवाई करण्याची तजविज ठेवली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुकुंदनगर, टिमवी कॉलनी, पुणे येथे ठेकेदाराच्या हलगर्जीपणामुळे झालेल्या अपघातात एका युवकाचा मृत्यू झाल्याबाबत

**(४०) ४६७०८ (२०-०५-२०१६). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुकुंदनगर, टिमवी कॉलनी, पुणे येथे रस्त्याच्या कडेला टाकलेल्या पाईपलाईनच्या कामात ठेकेदाराच्या हलगर्जीपणामुळे झालेल्या अपघातात एका युवकाचा मृत्यू झाल्याची बाब माहे जानेवारी २०१६ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त ठिकाणी पुणे महापालिकेचे काम सुरू असताना धोक्याची सूचना देणारे फलक किंवा संरक्षक बॅरिगेटस लावण्यात आलेले नव्हते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०७-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) सदर घटनेबाबत पुणे महानगरपालिकेचे चे ठेकेदाराविरुध्द स्वारगेट पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ७/२०१६ भा.द.वि. कलम ३०४ (अ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात आरोपीला अटक करण्यात आली असून त्याचेविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले आहे. गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील प्रस्तावित गृहनिर्माण धोरण आणि केंद्र शासनाच्या ताब्यात अथवा मालकीच्या असलेल्या जमिनीवरील झोपडपट्ट्यांचा विकास करण्याबाबत**

**(४१) ४७१९० (३१-०५-२०१६). श्री.राहूल कुल (दौंड), श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दीर्घकाळ प्रलंबित असलेले गृहनिर्माण धोरण माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासनाच्या ताब्यात अथवा मालकीच्या असलेल्या जमिनीवरील झोपडपट्ट्यांचा विकास करावयाचा प्रस्ताव महाराष्ट्र शासनाने केंद्र शासनाला सादर केला असून त्याबाबत निर्णय माहे फेब्रुवारी, २०१६ वा त्या दरम्यान होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील प्रस्तावित गृहनिर्माण धोरण् आणि केंद्र शासनाच्या ताब्यात अथवा मालकीच्या असलेल्या जमिनीवरील झोपडपट्ट्यांचा विकास करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (११-०८-२०१६) :**(१), (२) व (३) केंद्र शासनाच्या ताब्यात अथवा मालकीच्या असलेल्या जमिनीवरील झोपडपट्टयंचा विकास करावयाचा प्रस्तावाबाबत केंद्र शासनाकडे शासन स्तरावर वेळोवेळी पाठपुरावा करण्यात आला आहे. केंद्र शासनाने जून, २०१५ मध्ये सुरु केलेल्या प्रधानमंत्री आवास योजनेच्या मार्गदर्शक तत्वातील मुद्या क्रमांक १०.१ मधील तरतुदीप्रमाणे केंद्रीय मंत्रालये अथवा त्यांच्या अधिपत्याखालील संस्थांच्या ताब्यातील जमिनीवर असलेल्या झोपड्यांचे पुनर्वसन त्या-त्या संस्थांनी करावे असे नमूद करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई किनारपट्टी रस्त्यांच्या प्रकल्पांना केंद्र शासनाच्या पर्यावरण मंत्रालयाने मंजुरी दिल्याबाबत**

**(४२) ४७२४२ (१९-०५-२०१६). श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईवरील वाहतुकीचा भार काही प्रमाणावर हलका करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या किनारपट्टी रस्त्यांचा प्रस्ताव राज्य शासनाने केंद्र शासनाच्या पर्यावरण मंत्रालयाकडे सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मुंबई किनारपट्टी रस्त्यांच्या प्रकल्पांना केंद्र शासनाच्या पर्यावरण मंत्रालयाने माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान मंजूरी दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्त्यांची लांबी किती किलो मीटर आहे, त्याची सुरुवात व शेवट मुंबईच्या कोणत्या भागापासून होणार आहे,

(४) असल्यास, सदर किनारपट्टी रस्त्यांच्या कामासाठी साधारणत: किती कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात येत आहे, त्यात केंद्र शासनाचा हिस्सा किती असणार आहे,

(५) असल्यास, सदर रस्त्यांच्या प्रत्यक्ष बांधकामांना केव्हा सुरुवात केली जाणार आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०८-२०१६) :**(१) व (२) केंद्र शासन पर्यावरण व वनमंत्रालयाकडील दिनांक ३०.१२.२०१५ रोजीच्या अधिसूचनेनुसार दिनांक ६.१.२०११ रोजीच्या सीआरझेड अधिसूचनेमधील तरतूदींमध्ये सुधारणांना मंजूरी दिलेली आहे. त्यानुषंगाने कोस्टल रोडचा प्रस्ताव महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ॲथारिटीकडे मंजूरीसाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून सादर करण्यात आलेला आहे.

(३) सदर रस्त्याची लांबी अंदाजे २९.२ किलो मीटर इतकी प्रस्तावित आहे. रस्त्यास सुरुवात प्रींसेस स्ट्रीट मरीन ड्राईव्ह व शेवट कांदिवली मिंट चौकी लिंक रोड येथे आहे.

(४) सदर रस्त्याच्या कामाचा अंदाजित खर्च रु.१२,००० कोटी असुर बृहन्मुंबई महानगरपालिकेने सन २०१६-१७ च्या अंदापत्रकामध्ये रु.१००० कोटीची तरतूद केलेली आहे. आर्थिक तरतूदीमध्ये केंद्र शासनाचा हिस्सा नाही.

(५) सदर प्रकल्पास पर्यावरण व वनमंत्रालय, भारत सरकार यांची मंजूरी मिळाल्यानंतर प्रकल्पास सुरुवात होईल.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लासलगाव व विंचूर (ता.निफाड, जि.नाशिक) शहरातून अवैध माल व प्रवासी वाहतुकीचे प्रमाण वाढल्याबाबत**

**(४३) ४७३०७ (२४-०५-२०१६). डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लासलगाव व विंचूर (ता.निफाड, जि.नाशिक) शहरातून अवैध माल व प्रवासी वाहतुकीचे प्रमाण वाढले असून पोलीस याकडे दुर्लक्ष करीत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अवैध माल व प्रवासी वाहतूकीला आळा घालण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-११-०००२) :**(१) व (२) हे खरे नाही.

लासलगाव व विंचूर शहरातुन अवैध माल व प्रवासी वाहतुक करणाऱ्या वाहनांवर माहे जानेवारी, २०१६ ते आजपावेतो मोटार वाहन कायद्यान्वये एकुण ३१ केसेस दाखल करुन ३७,३००/- रुपये दंड आकारण्यात आलेला आहे. तसेच वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या इतर वाहनांवर आजपावेतो ३१९ केसेस करण्यात येवुन ३३,१००/- रुपये दंड आकारण्यात आलेला आहे.

(३) विलंब झालेला नाही.

---

## मुंबई उपनगर भांडूप (प) व कांजूर मार्ग येथे नवीन पूल बनविण्याबाबत

**(४४) ४७४४५ (१६-०५-२०१६). श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगर (पूर्व उपनगरे) कांजूर-भांडूप पूर्वे-पश्चिम, भांडूप रेल्वे स्टेशन वरून अवजड वाहतूक करणारा पूल व रस्ता सन २०१४ ते २०३४ च्या नवीन विकास आराखड्यात करण्यात यावा अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधिंनी दिनांक २० मार्च, २०१५ रोजी वा त्या दरम्यान मा.मुख्यमंत्री व बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पूल व रस्त्याचा समावेश नवीन विकास आराखड्यात करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०८-२०१६) :**(१) होय.

शासनास असे निवेदन प्राप्त झालेले आहे.

(२) व (३) बृहन्मुंबई क्षेत्राच्या सुधारित विकास योजनेसंदर्भाने कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून सुरु असल्याने याअनुषंगाने गुणवत्तेनुसार उचित कार्यवाही करण्याबाबत आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना सुचित केलेले आहे.

---

## पुणे शहरात विशेषतः झपाट्याने विकसित होणाऱ्या उपनगरांमधील नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी अग्निशमन दलाची आणखी २० केंद्रे उभारणेबाबत

**(४५) ४८२२७ (१६-०५-२०१६). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरात विशेषतः झपाट्याने विकसित होणाऱ्या उपनगरांमधील नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी अग्निशमन दलाची आणखी २० केंद्रे उभारणे आवश्यक असल्याचा अग्निशमन दलाचा प्रस्ताव पुणे महापालिकेकडे प्रलंबित असल्याची बाब माहे जानेवारी, २०१६ वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सध्या अग्निशमन दलाकडे कर्मचाऱ्यांची संख्या खूपच कमी असल्यामुळे कर्मचाऱ्यांवर ताण येतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०९-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) अग्निशमन दलाकडील रिक्त असणाऱ्या जागा भरण्याची कार्यवाही पुणे महानगरपालिकेकडून सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेत उभारलेलया शॉपिंग सेंटर, दुकाने, गाळे, बाजार ओटे या जागेच्या मासिक जागा लायसेन्स फी मध्ये केलेल्या दरवाढीबाबत**

**(४६) ४९२०६ (१६-०५-२०१६). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेत उभारलेल्या शॉपिंग सेंटर, दुकाने, गाळे, बाजार ओटे या जागेच्या मासिक जागा लायसेन्स फी मध्ये केलेली अन्यायकारक दरवाढ मागे घेण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ६ नोव्हेंबर, २०१५ रोजी शासनाकडे केलेली आहे, हे खरे आहे काय.
(२) असल्यास, सदरची दरवाढ तात्काळ मागे घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.
(३) नसल्यास, विंलबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०९-२०१६) :**(१) होय.
(२) नाशिक महानगरपालिकेच्या व्यापारी संकुलातील गाळ्यांच्या भाडेवाढीबाबत महासभेच्या अंतिम निर्णय अद्याप झालेला नाही.
प्रस्तुत प्रकरणी नाशिक महानगरपालिका महासभेने ठराव क्र. २ दि. १६.४.२०१६ अन्वये, रेडीरेकनरच्या दराची छाननी करण्याकरीता मा.महापौर यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली आहे.
सदर समितीमार्फत रेडीरेकनरच्या दराची पडताळणी झाल्यानंतर महासभेचा अंतिम निर्णय होणे अपेक्षित आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे शहरामध्ये शहरी गरिबांसाठी मुलभूत सुविधा कार्यक्रमाअंतर्गत अधिक खर्च झाल्याबाबत**

**(४७) ४९३२४ (१६-०५-२०१६). श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरात शहरी गरिबांसाठी मूलभूत सुविधा कार्यक्रमांतर्गत वारज्यातील प्रकल्पात तब्बल ३४ कोटी रुपये अधिक खर्च झाला असल्याची बाब माहे जानेवारी, २०१५ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जागा ताब्यात नसताना या ठिकाणी महानगरपालिकेने निविदा प्रक्रिया राबविली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे, वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीही कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०९-२०१६) :**(१) वारजे प्रकल्पाची निविदा रुपये ७०,४६,०६,३५६/- असून तयापैकी वारज्यातील १३४४ सदनिका बांधणे करीता रुपये ४६,५४,७८,४८४/- खर्च झाला आहे.
(२) वारजे स.न. १०९ ची जागा निविदा प्रक्रिया राबविताना ताब्यात होती व त्या ठिकाणी काम सुरु केल्यानंतर सन ८७ ची जागा सन २०१० मध्ये ताब्यात आली.
(२) स.न. १०९ मध्ये ११२० सदनिका बांधण्यात आल्या असून, वारजे स.नं.८४ ची जागा सन २०१० मध्ये ताब्यात आल्यानंतर त्याठिकाणी २२४ सदनिका बांधणेत आल्या आहेत. त्यापैकी १२१६ सदनिका बाधीत लाभार्थी यांना वाटप करणेत आल्या आहेत. उर्वरित सदनिका वाटप प्रक्रिया संबंधित क्षेत्रीय कार्यालयाकडून सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील ९३ नविन नगरपंचायतींना अधिकारी वर्ग न मिळाल्याबाबत**

**(४८) ५२२१५ (१६-०५-२०१६). श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने राज्यात ९३ नविन नगरपंचायती निर्माण केल्या, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त पंचायती निर्माण करतांना मुख्य कार्यकारी अधिकारी, रोखपाल, नगररचनाकार, स्थापत्य शास्त्रज्ञ इत्यादी पदांना वित्त विभागाची मंजूरी घेतली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यामुळे नगरपालिकांना प्रशासनच उपलब्ध नसल्याने सर्व कारभार ठप्प झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने निश्चित कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०९-२०१६) :**(१), (२) व (३) हे खरे नाही.
(४) आतापर्यंत राज्यातील तालुका मुख्यालयांच्या ठिकाणी ११३ ग्राम पंचायतींना नगर परिषदा / नगर पंचायतींचा दर्जा देण्यात आला आहे.

नवनिर्मित नगर परिषद / नगर पंचायतींमधील पदांचा आकृतीबंध मंजूर करतांना वित्त विभागाची तसेच मंत्रीमंडळाची देखिल मान्यता घेण्यात आलेली आहे. त्यानुसार शासन निर्णय, नगर विकास विभाग दि. ०५.०७.२०१६ अन्वये नवनिर्मित नगर पंचायतींमधील पदांचा आकृतीबंध मंजूर करण्यात आला असून पदांची निर्मिती करण्यात आली आहे. तसेच सर्व विभागीय आयुक्यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करुन पदभरतीची कार्यवाही एका महिन्यात पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर महानगरपालिकेच्या ५९ शाळांमध्ये मुलभूत सोयीसुविधा नसल्याबाबत**

**(४९) ५२२४८ (०४-०५-२०१६). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर महानगरपालिकेच्या ५९ शाळा सध्या सुरु असून त्यामध्ये मराठी, कन्नड, तेलुगु व उर्दु माध्यमांचा समावेश आहे. मात्र या शाळांमध्ये अपंग विद्यार्थ्यांसाठी रॅम्प नाही, पुरेशा वर्गखोल्या नाहीत विजेची सुविधा नाही, मुख्याध्यापकांना बसण्यासाठी स्वतंत्र खोली नाही, स्वच्छतागृह व पिण्याच्या पाण्याची सोय नसल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शाळांमध्ये मुलभूत सुविधा शासनाने उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०९-२०१६) :**(१) व (२) ५९ शाळांपैकी ०९ शाळांमध्ये रॅम्प नसून त्या देणेबाबत कार्यवाही करण्यात येत आहे. वर्ग खोल्या, वीजेची सुविधा सर्व शाळांमध्ये उपलब्ध आहे. ५९ शाळापैकी ०५ शाळांमध्ये शौचालयाची सुविधा नसून ती उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**प्रसूतिगृह व पॉलिक्लिनीकसाठी सवलतीच्या दरात जमीन घेऊन नंतर गरीब रुग्णांची सेवा न करणाऱ्यांवर कारवाई करण्याच्या पालिकेच्या प्रस्तावित धोरणाबाबत**

**(५०) ५२३९६ (१३-०५-२०१६). श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महापालिकेकडून प्रसूतिगृह व पॉलिक्लिनीकसाठी सवलतीच्या दरात जमीन घेऊन नंतर गरीब रुग्णांची सेवा न करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत महानगरपालिकेतर्फे लवकरच धोरण आणले जाणार असल्याचे माहे जानेवारी, २०१६ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात शासनाने निर्णय घेऊन सदर धोरण अंमलात आणण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०९-२०१६) :**(१) हे खरे आहे.

तथापि, समायोजित आरक्षणांतर्गत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य खात्यास प्राप्त होणाऱ्या जागेमध्ये सर्वजनिक-खाजगी सहभाग प्रोत्साहन धोरणांतर्गत प्रसुतीगृह चालविण्यासाठी सार्वजनिक निविदा मागवून उच्चतम देकार देणाऱ्या खाजगी संस्थांना १० आणि ३० वर्षांच्या कालावधीकरिता प्रतिमास प्रति. चौ.फुट रु.१/- नाममात्र भाडेतत्वावर काही अटी व शर्तीसापेक्ष सुधार समिती व महानगरपालिका समिती ठराव करुन जागा देण्यात येत होत्या.

काही संस्थांनी महानगरपालिकेसमवेत केलेल्या करारपत्रामधील अटी शर्तींचा भंग केल्यामुळे सार्वजनिक-खाजगी सहभाग प्रोत्साहन धोरणाच्या अटी व शर्तींमध्ये बदल करण्याचा निर्णय घेण्यात आला.

सार्वजनिक-खाजगी सहभाग प्रोत्साहन धोरणांतर्गत अटी व शर्तींस आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी दिनांक १०.०३.२०१६ रोजी मंजुरी दिली आहे.

(२) व (३) सदर धोरण निश्चित करण्याची प्रक्रिया महानगरपालिकेमार्फत कार्यान्वित आहे.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.